रविवार, दि. १५ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनस्नेहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

परतूर मतदारसंघातील रस्ते घोटाळा प्रकरण

## वीस दिवस उलटले तरी कारवाई नाही

### लोणीकरांच्या उपोषणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष




**जालना । प्रतिनिधी -** परतूर मतदारसंघातील कथित रस्ते घोटाळा प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते विजय लोणीकर यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला आज तब्बल २० दिवस पूर्ण झाले असून अद्यापही संबंधित दोषींवर ठोस कारवाई झालेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उपोषण सुरू असतानाही चौकशी व कारवाईबाबत कोणतीही ठोस हालचाल दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

लोणीकर यांनी केलेल्या आरोपानुसार, ग्राम विकास विभागाच्या '२५-१५' योजनेतील निधीचा वापर राज्य रस्त्यांवरील कामांसाठी करण्यात आला असल्याचा गंभीर आरोप आहे. विशेष म्हणजे या कामांसाठी शासनमान्य प्रक्रियेऐवजी सरकारी कंत्राटदारांच्या नावावर प्रत्येकी तीन-तीन लाख रुपयांची व्हाउचर काढून देयके अदा करण्यात आली, असेही त्यांनी सांगितले आहे. या संदर्भातील कागदपत्रे व व्हाउचरची पीडीएफ प्रतही उपलब्ध असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

यातील आणखी गंभीर बाब म्हणजे महाराष्ट्र शासनाने २०१९ ते २०२३ या कालावधीत '२५-१५' योजनेचा वापर बंद केला होता, असे असताना त्या हेडअंतर्गत निधी कसा खर्च करण्यात आला, हा प्रश्न उपस्थित होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मात्र ''या योजनेची काही शिल्लक रक्कम उपलब्ध होती, त्यामुळे ती वापरण्यात आली,'' असे स्पष्टीकरण दिले जात आहे. परंतु योजना बंद असताना ही शिल्लक रक्कम नेमकी कुठून उपलब्ध झाली, याबाबत स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने संशय अधिकच बळावत आहे.

लोणीकर यांच्या मते, कोरोना काळात शासनाकडून प्रामुख्याने आरोग्य विभागासाठीच निधी उपलब्ध करून पान २ वर

काँग्रेसने संसदेच्या प्रतिष्ठेचा अवमान केल्याने जालन्यात भाजप आक्रमक

## संसदेचा अवमान हा देशाचा अपमान - भास्कर दानवे




**जालना । प्रतिनिधी -** संसदेत १२ मार्च २०२६ रोजी केंद्रीय अर्थसंकल्पीय बजेटचे कामकाज सुरू असताना काँग्रेस नेते खा. राहुल गांधी व काँग्रेस तसेच इतर विरोधी पक्षातील काही खासदारांनी संसद परिसरात चहा-बिस्कीटसह चायपार्टी आयोजित केली. संसद ही देशाची सर्वोच्च लोकशाही संस्था असताना अशा प्रकारचे कृत्य करणे हे अत्यंत दुर्दैवी असून संसदेच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे आहे. तसेच संसदीय नियम व अध्यक्षांच्या आदेशांची अवहेलना करणारी आहे. या घटनेच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी, जालना च्या वतीने शनिवार दिनांक १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६:१० वाजता भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे जोरदार निदर्शने करण्यात आली.

यावेळी बोलताना भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, संसदेत केंद्रीय अर्थसंकल्पासारख्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू असताना काँग्रेस पक्षातील खासदारांनी संसद परिसरात चायपार्टी आयोजित करणे हे संसदीय परंपरेला धरून नाही. लोकशाही संस्थांची प्रतिष्ठा राखणे ही सर्व लोकप्रतिनिधींची जबाबदारी असताना अशा प्रकारच्या कृत्यामुळे संसदेची मर्यादा भंग होते. संसदेचे नियम व अध्यक्षांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून केलेले हे कृत्य निषेधार्ह असल्याचेही त्यांनी नमूद केले. अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, अशी मागणी भारतीय जनता पार्टी, जालना यांच्या वतीने करण्यात आली.

तसेच देशातील जनतेमध्ये चुकीचा संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जात असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या विकासासाठी सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, रामेश्वर भांदरगे, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, जेष्ठ कार्यकर्ते प्रभुलाल गोमतीवाले, शीतलप्रसाद पांडे, नारायण पवार, मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे, संजय डोंगरे, सुनील खरे, महेश निकम, संजय आटोळे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे, गोविंद ढेंबरे, शिवप्रकाश चितळकर, गोवर्धन कोल्हे, देविदास देशमुख, राजेश जोशी, एससी मोर्चा जिल्हाध्यक्ष अनिल सरकटे, नगरसेवक रमेश गौरक्षक, कल्याण भदनेकर, राजाराम जाधव, जगदीश येनगुपटला, गजानन खरात, बाबा उगले, शाम उगले, नागेश अंभोरे, विष्णू राठोड, राहुल यादव आदीसह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. काँग्रेस व संबंधित खासदारांविरोधात घोषणाबाजी करत तीव्र निषेध व्यक्त केला.

युवा आदर्श

### खरे सत्य ...

व्यवस्थापन कुजले
दुर्गंधी सर्वत्र दर्वळे
आश्वासन तुडुंबलेले
आशा दावी दर वेळे
हेलपाटे घालू दमले
केवढा घाम निथळे
भावना लवलेश ना
कोरडे पडलेले तळे
शुभवार्ता येई कानी
वाटेकडे लागे डोळे
तपास योग्य दिशेने
विश्वास ठेवती भोळे
आरोपी धरे दोनतीन
अचंबित झाले डोळे
कोर्टच्या आवरातचं
केसेस निभ्रांत लोळे
अटकपूर्व जामीन तो
काहींना त्वरित मिळे
कापले जाती भोपळे
तयार धार धार विळे
एन्काउंटर रे कैद्याचे
केस तिसरीकडे वळे
किंतू परंतु शंकाकिडे
कायम मना वळ वळे
खरा न्याय झाला का
सांगा कुणीतर निर्मळे
खरे सत्य खोल लपले
कायम उदरी डचमळे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर नेर येथे उत्साहात संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आज नेर येथे उत्साहात पार पडले. या शिबिरास विविध विभागातील अधिकारी व मान्यवरांची उपस्थिती होती. शिबिरास आमदार बबनराव लोणीकर, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, उपविभागीय कृषी अधिकारी प्रशांत पवार, तहसीलदार छाया पवार, तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड, मंडळ कृषी अधिकारी पवन बैनाडे, भरत नागरे, प्रियंका क्षीरसागर तसेच कृषी विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. आमदार बबनराव लोणीकर यांनी कृषी विभागाच्या स्टॉलला भेट देऊन कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती घेतली व संबंधित अधिकाऱ्यांकडून योजनांचा आढावा घेतला.

शिबिरादरम्यान कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. तसेच शेतकऱ्यांना विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले व आलेल्या समस्यांचे तत्काळ निरसन करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांची माहिती मिळाली तसेच त्यांच्या समस्या सोडविण्यास मदत झाली. त्यामुळे उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची अंमलबजावणी करण्याचे आवाहन - मिन्नू पीएम



**जालना । प्रतिनिधी -** ग्रामविकासाला गती देण्यासाठी आणि गावांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित विभाग, ग्रामपंचायती व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले.


घनसावंगी तालुक्यातील राजेगाव, रवना व निपाणी पिंपळगाव या गावात भेटी देण्यात आली यावेळी त्या बोलत होत्या.

त्या म्हणाल्या की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून गावांमध्ये मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, पर्यावरण संवर्धन, ग्रामविकासाची विविध कामे तसेच लोकसहभागातून शाश्वत विकास साधण्यावर भर दिला जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची संधी ग्रामपंचायतींना उपलब्ध झाली आहे.

अभियानांतर्गत गावांमध्ये स्वच्छता मोहिमा, वृक्षारोपण, जलसंधारण, प्लास्टिक मुक्त गाव, शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्तता, तसेच ग्रामपंचायत स्तरावर विविध विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमांमध्ये ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपले गाव आदर्श व समृद्ध करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे

यावेळी गटविकास अधिकारी प्रदीप कदम ,सहाय्यक गटविकास अधिकारी पान २ वर





शहरातील तापमान ३७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने कडक उन्हापासून बचावासाठी नागरिकांनी टोपी व गॉगल्स खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी केल्याचे चित्र दिसून आले.

(छायाचित्र किरण खानापुरे)

संपादकीय पान

# विनोद सम्राट

आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांचा काल म्हणजे १४ मार्च रोजी स्मृतिदिन होता. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त हा विशेष लेख. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

जागतिक ग्राहक दिन;

# ग्राहकांना अधिकार देणारा दिवस

आधुनिक अर्थव्यवस्थेत ग्राहक हा केंद्रबिंदू मानला जातो. बाजारपेठेत वस्तू आणि सेवा तयार करणारे उत्पादक, व्यापारी, सेवा पुरवठादार यांचे अस्तित्व ग्राहकांमुळेच टिकून असते. त्यामुळे ग्राहकांचे हित, सुरक्षा आणि अधिकार यांचे संरक्षण करणे ही शासन व समाजाची महत्त्वाची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षी १५ मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक हक्क दिन' ( ) म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश ग्राहकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे आणि बाजारपेठेत न्याय्य व्यवहार सुनिश्चित करणे हा आहे.

**ग्राहक म्हणजे काय?**

ज्या व्यक्तीने स्वतःच्या वापरासाठी किंवा उपभोगासाठी एखादी वस्तू खरेदी केली किंवा सेवा घेतली, त्या व्यक्तीला ग्राहक असे म्हणतात. भारतीय कायद्यानुसार, वस्तू किंवा सेवा विकत घेणारा, त्यासाठी किंमत देणारा किंवा त्या सेवेचा लाभ घेणारा प्रत्येक नागरिक ग्राहक मानला जातो. ग्राहक हा अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठा घटक असून त्याचे संरक्षण हे लोककल्याणकारी राज्याचे कर्तव्य आहे.

**ग्राहकांचे मूलभूत अधिकार**

ग्राहक चळवळीमुळे ग्राहकांना काही मूलभूत अधिकार प्राप्त झाले आहेत. १९६२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन. एफ. केनीडी यांनी अमेरिकन काँग्रेससमोर ग्राहक हक्कांविषयी ऐतिहासिक भाषण करत चार मूलभूत अधिकार मांडले. त्यात पुढील अधिकारांचा समावेश होता

सुरक्षेचा अधिकार ( ) धोकादायक वस्तू किंवा सेवांपासून संरक्षण.

माहितीचा अधिकार ( ) वस्तूची गुणवत्ता, प्रमाण, किंमत आणि दर्जा याबाबत अचूक माहिती मिळण्याचा अधिकार.

निवडीचा अधिकार ( ) विविध पर्यायांमधून वस्तू किंवा सेवा निवडण्याचा अधिकार.

मते मांडण्याचा अधिकार ( ) ग्राहकांचे मत शासन आणि धोरण प्रक्रियेत ऐकले जाणे.

यानंतर संयुक्त राष्ट्रांनी १९८५ मध्ये ग्राहक संरक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारून ग्राहक शिक्षण, तक्रार निवारण, मूलभूत गरजांची पूर्तता




आणि निरोगी पर्यावरणाचा अधिकार यांसारखे अतिरिक्त अधिकारही मान्य केले.

**१५ मार्चलाच ग्राहक दिन का ?**

१५ मार्च १९६२ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी ग्राहक हक्कांचा प्रश्न प्रथमच जागतिक पातळीवर मांडला. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ १९८३ पासून जगभर १५ मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक हक्क दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला. या दिवशी ग्राहक संघटना, शासन संस्था आणि सामाजिक संघटना ग्राहक हक्कांविषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करतात.

**ग्राहक चळवळ म्हणजे काय?**

ग्राहक चळवळ म्हणजे ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी चालवली जाणारी सामाजिक आणि कायदेशीर चळवळ. बाजारपेठेतील फसवणूक, निकृष्ट दर्जाची उत्पादने, अन्यायकारक व्यापार पद्धती आणि ग्राहकांची फसवणूक याविरोधात जनजागृती करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश आहे. जगभरातील ग्राहक संघटनांनी एकत्र येऊन ग्राहकांच्या हितासाठी विविध मोहिमा राबवल्या आणि अनेक देशांमध्ये ग्राहक संरक्षणाचे कायदे लागू झाले.

**भारतातील ग्राहक चळवळीची सुरुवात**

भारतामध्ये ग्राहक चळवळ १९६० च्या दशकात सुरू झाली. ग्राहक संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासकांनी ग्राहक संरक्षणासाठी व्यापक जनजागृती केली. या चळवळीचा सर्वात मोठा टप्पा म्हणजे ग्राहक संरक्षण कायदा १९८६ ( १९८६ ) हा कायदा. या कायद्यामुळे ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ग्राहक न्यायालयांची व्यवस्था करण्यात आली.

यानंतर बदलत्या बाजारपेठेच्या गरजेनुसार भारत सरकारने ग्राहक संरक्षण कायदा ( २०१९ ) लागू केला. या कायद्यामुळे ई-कॉमर्स व्यवहार, भ्रामक जाहिराती आणि ऑनलाइन व्यापार यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन तरतुदी करण्यात आल्या.ऑनलाइन वस्तू मागवली पण वस्तू मिळाली नाही,चुकीची वा निकृष्ट वस्तू मिळाली,

पैसे घेतले पण सेवा दिली नाही,भ्रामक ऑनलाइन जाहिरात करून ग्राहक फसवला, ई-कॉमर्स कंपनीने रिफंड दिला नाही,आदी सर्व तक्रारी ग्राहक संरक्षण कायदा अंतर्गत करता येतात. तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी तीन-स्तरीय ग्राहक आयोग व्यवस्था कार्यरत करण्यात आली आहे.

**भारतातील ग्राहक दिन**

जागतिक पातळीवर १५ मार्च हा ग्राहक दिन आहे. तर भारतामध्ये २४ डिसेंबर हा 'राष्ट्रीय ग्राहक दिन' म्हणून साजरा केला जातो. कारण २४ डिसेंबर १९८६ रोजी ग्राहक संरक्षण कायद्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली. या दिवशी ग्राहक हक्कांविषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात.

महाराष्ट्रातील ग्राहक चळवळ उभारण्यात प्रामुख्याने बिंदू माधव जोशी,स्वातीताई शहाणे, बापूसाहेब महाशब्दे यांच्यासह विविध संघटनांनी योगदान दिले. त्यांनी ग्राहक हक्कांसाठी विविध संघटना उभारून जनजागृती, कायदेशीर लढाया आणि संशोधनकार्य केले.

**महाराष्ट्र शासनाची भूमिका**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा हे एक मंत्रालय निर्माण केले आहे. त्या अंतर्गत ग्राहक संरक्षणासाठी स्वतंत्र ग्राहक संरक्षण विभाग, राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, राज्य व जिल्हा ग्राहक आयोग,( जिल्हा ग्राहक न्यायालय ) राज्य ग्राहक आयोग, आणि ग्राहक संघटनांनी ग्राहक मार्गदर्शन केंद्रे सुरू केली आहेत.जिल्हा ग्राहक न्यायालयाच्या मार्फत राज्यात ग्राहक जनजागृतीसाठी ग्राहक तक्रार निवारण केंद्रे, तसेच शालेय-महाविद्यालयीन स्तरावर ग्राहक शिक्षण कार्यक्रम राबवले जातात.५० लाखांपर्यंतच्या फसवणुकीसाठी जिल्हास्तरावरच ग्राहकांना याचिका दाखल करता येते आणि जिल्हा ग्राहक न्यायालयाकडून या संदर्भात न्याय दिला जाते. याशिवाय ५० लाख ते दोन कोटी पर्यंत राज्य व त्या पुढच्या रकमेसाठी केंद्रीय जिल्हा ग्राहक आयोगात खटलात चालवला जाऊ शकतो. जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हा स्तरावर ग्राहकांच्या संदर्भातील अनेक समित्यांचे सदस्य सचिव म्हणून काम बघतात त्यांच्यामार्फत ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठका आयोजित केल्या जातात.

त्यामुळे सध्या बाजारातील हालचाली बघता जागतिक ग्राहक दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून ग्राहक सक्षमीकरणाचा संदेश देणारा दिवस आहे. बाजारपेठेतील अन्यायकारक पद्धतींना आळा घालण्यासाठी ग्राहक जागरूक असणे आवश्यक आहे. शासन, ग्राहक संघटना आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच ग्राहकांचे हित सुरक्षित राहू शकते. म्हणूनच १५ मार्चचा दिवस आपल्याला ग्राहक म्हणून आपल्या अधिकारांची जाणीव करून देतो आणि न्याय्य व पारदर्शक बाजारपेठ निर्माण करण्यासाठी प्रेरणा देतो.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# एच.पी.व्ही. लसीकरण मोहिम अंतर्गत अंदाजीत २४३५३ मुलींना लस देणार

**जालना** -राष्ट्रीयस्तरावर दि.२८ फेब्रुवारी रोजी मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांच्या शुभ हस्ते एच.पी.व्ही.() लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यांत आला. जागतिक महिला दिनानिमित्त राज्यस्तरावर ०८ मार्च रोजी मा.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या शुभ हस्ते एच.पी.व्ही.() लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यांत आला. त्या अनुषगांने जालना जिल्हयातील १४ वर्षे पुर्ण व १५ वर्षे पुर्ण न झालेल्या एकुण २४३५३ अंदाजित मुलींना एच.पी.व्ही. लस देण्यांत येणारं आहे.

ज्यामुळे सदरील मुली गर्भाशयाच्या मुख कर्करोगापासुन संरक्षित होईल. जगभरात आतापर्यंत ५० कोटीहुन अधिक महिलांना लस देण्यांत आलेली आहे. सन २००६ पासुन एच.पी.व्ही. लस उपलब्ध असल्यामुळे सदरील लस नवीन नाही. सदरील लस अत्यंत सुरक्षित आहे. या बाबत कोणत्याही अफवांवर विश्वासु ठेवु नये. एच.पी.व्ही.लस जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपलब्ध असुन मोफत देण्यांत येईल. आपल्या मुलींचे गर्भाशयाच्या मुख कर्करोगापासुन संरक्षण करावे असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यांत येत आहे.

**- डॉ.जयश्री भुसारे**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, जालना.**



## टायपिंग डिसेंबर २०२५ परीक्षेत भावसार इन्स्टिट्यूटचा ८५% निकाल

**जालना** - डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जीसीसी टीबीसी टायपिंग परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत न्यू भावसार लघुलेखन व संगणक टंकलेखन संस्थेच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले असून, संस्थेचा एकूण निकाल ८५ टक्के लागला आहे. संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उच्चांकी गुण प्राप्त केले आहेत: इंग्रजी ५० श.प्र.मि.: पवन शेरे (८८%). इंग्रजी ४० श.प्र.मि.: दीक्षा रगडे (९५%). इंग्रजी ३० श.प्र.मि.: प्रणव नाईक (९८.५%). मराठी ३० श.प्र.मि.: दीक्षा रगडे (९५.५%).

पान १ वरुन

## वीस दिवस ...

देण्यात येत होता, त्यामुळे अशा परिस्थितीत '२५-१५' योजनेचा निधी उपलब्ध असल्याचा दावा संशयास्पद वाटतो. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर आणि जबाबदार व्यक्तींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, उपोषणाचा कालावधी वाढत असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये संताप वाढत आहे. संबंधित घोटाळ्याची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा लोणीकर यांनी दिला आहे.

आता उपोषणाला २० दिवस उलटूनही प्रशासनाने ठोस निर्णय न घेतल्याने या प्रकरणाकडे जिल्हा प्रशासन आणि राज्य शासन नेमकी काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध ...

पी.पी खिल्लारे, गट शिक्षणाधिकारी रवी जोशी, तालुका वैद्यकीय अधिकारी शिवाजी गायकवाड, उपकार्यकारी अभियंता नरेंद्र ठाकूर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# जालना समाजकार्य महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - कर्मवीर प्रतिष्ठान संचालित जालना समाजकार्य महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यात आले यावेळी उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष उप प्राचार्य डॉ.मधु खोब्रागडे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासकीय अधिकारी रमेश गजर, सांस्कृतिक समन्वयक प्रा. डॉ. दिपक बुक्तरे, राजू वाघमारे हे उपस्थित होते यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के म्हणाले की वार्षिक स्नेहसंमेलनातुन विदयार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळतो व व्यक्तिमत्व विकासाची संधी प्राप्त होते तेव्हा विदयार्थ्यांनी अश्या प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी होऊन आपला व्यक्तिमत्व विकास करून घ्यावा.

या वार्षिक स्नेहसंमेलनात विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले यात वक्तृत्व स्पर्धेत -भास्कर साळवे - प्रथम,नयना धांडगे- द्वितीय,योगेश खोसे - तृतीय, वादविवाद स्पर्धा - भास्कर साळवे, योगेश खोसे - प्रथम ,सागर लोखंडे,साक्षी रणशूर - द्वितीय,योगेश पवार,विकास राठोड - तृतीय,काव्य वाचन स्पर्धा - शुभांगी भुतेकर - प्रथम,भास्कर साळवे- द्वितीय,योगेश पवार तृतीय,निबंध स्पर्धा - नाटकर तुकाराम - प्रथम,ईश्वर चव्हाण - द्वितीय,योगेश पवार - तृतीय,पोस्टर्स स्पर्धा - नयना धांडगे - प्रथम योगेश पवार - द्वितीय, राठोड विकास - तृतीय,प्रश्नमंजुषा- साक्षी रणशूर,तुकाराम नाटकर - प्रथम,योगेश पवार, विकास राठोड- द्वितीय, पूजा प्रधान,योगेश खोसे - तृतीय, स्लोगन स्पर्धा - ईश्वर चव्हाण - प्रथम,योगेश पवार - द्वितीय,ज्ञानेश्वर इंदलकर - तृतीय,गीत गायन स्पर्धा - योगेश पवार - प्रथम, विकास राठोड - द्वितीय,श्रद्धा धुमाळ - तृतीय,अंताक्षरी स्पर्धा - शुभांगी राठोड, वष्णवी भुतेकर, नाटकर तुकाराम - प्रथम, योगेश पवार, साक्षी रणशूर, विकास राठोड - द्वितीय, सागर लोखंडे, श्रद्धा धुमाळ, पूजा प्रधान - तृतीय, रांगोळी स्पर्धा- निवेदिता बावस्कर -प्रथम, वैष्णवी भुतेकर - द्वितीय, शुभांगी भुतेकर- तृतीय, फॅन्सी ड्रेस स्पर्धा - शीतल मगर- प्रथम, साक्षी रणशूर - द्वितीय, वैभवी जगताप- तृतीय, संगीत खुर्ची - निवेदिता बावस्कर - प्रथम, योगेश पवार - द्वितीय, वैष्णवी भुतेकर- तृतीय क्रमांक पटकवला या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समरोप कार्यक्रमात सर्व विजेत्यां स्पर्धेकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन सांस्कृतिक समन्व्यक प्रा.डॉ. दिपक बुक्तरे यांनी केले या कार्यक्रमात परीक्षक म्हणून प्रा. मधू खोब्रागडे,प्रा.डॉ.सुधीर गायकवाड,प्रा. बालाजी मुंडे, प्रा.डॉ. नरसिंग पवार,प्रा. प्रवीण कणकुटे, प्रा. डॉ. मीना बोर्डे,प्रा. डॉ. रेणुका बडवणे, यांनी काम पहिले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश दांडगे, शिवाजी भुतेकर, संजय गाडे यांच्यासह विदयार्थ्यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश खोसे यांनी केले तर प्रास्ताविक सांस्कृतिक समन्व्यक प्रा.डॉ. दिपक बुक्तरे यांनी केले तर योगेश पवार यांनी आभार प्रदर्शन केले.



# नमाज़ अदा करणाऱ्यांच्या संख्येवर मर्यादा घालता येणार नाही, कायदा-सुव्यवस्था राखा

## उच्च न्यायालयाचे प्रशासनाला खडे बोल

**जालना । प्रतिनिधी -** अलाहाबाद उच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश प्रशासनाचा एक महत्त्वाचा निर्णय रद्दबातल ठरवला आहे, ज्यात संभल जिल्ह्यातील एका मशिदीत रमजानच्या काळात नमाज़ अदा करणाऱ्यांच्या संख्येवर मर्यादा घालण्यात आली होती. या निर्णयावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशन जालनाचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत यांनी सांगितले की, न्यायालयाचा हा निर्णय प्रत्येक नागरिकाच्या शांततेत उपासना करण्याच्या घटनात्मक अधिकाराचे रक्षण करणारा असून, कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे राज्याचेच कर्तव्य असल्याची स्पष्ट जाणीव करून देणारा आहे. प्रशासनाने आपल्या जबाबदारीतून पळ काढण्यासाठी नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणता कामा नये, हे या निकालाने अधोरेखित केले आहे.

ॲड. धनावत यांनी न्यायालयाच्या कठोर भूमिकेचे कौतुक केले. न्यायालय म्हणाले की, कायदा आणि सुव्यवस्थेची संभाव्य समस्या हे कारण देऊन उपासकांच्या संख्येवर मर्यादा घालण्याचा प्रशासनाचा युक्तिवाद पूर्णपणे अस्वीकार्य आहे. न्यायमूर्ती अतुल श्रीधरन आणि न्यायमूर्ती सिद्धार्थ नंदन यांच्या खंडपीठाने अत्यंत कठोर शब्दात म्हटले की, ''जर स्थानिक अधिकारी, म्हणजेच पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांना असे वाटत असेल की कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते आणि त्यामुळे त्यांना उपासकांची संख्या मर्यादित करायची असेल, तर त्यांनी एकतर आपल्या पदाचा राजीनामा द्यावा किंवा ते कायद्याचे राज्य लागू करण्यास सक्षम नसल्यास संभलमधून बदलीची मागणी करावी.'' ॲड. धनावत पुढे म्हणाले की, ''न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की प्रत्येक समुदायाला त्यांच्या निश्चित केलेल्या प्रार्थनास्थळी शांततेने प्रार्थना करता यावी, हे सुनिश्चित करणे हे राज्याचे कर्तव्य आहे.'' न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, जर प्रार्थनास्थळ खाजगी मालमत्तेवर असेल, तर त्यासाठी राज्याच्या परवानगीची आवश्यकता नाही. केवळ सार्वजनिक जमिनीवर किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करून धार्मिक विधी केले जात असतील, तरच राज्य परवानगीचा प्रश्न येतो. हा निर्णय भारतीय संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराला अधिक बळकटी देणारा आहे.

हे संपूर्ण प्रकरण मुनाझिर खान नावाच्या व्यक्तीने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान समोर आले. याचिकाकर्त्याचा आरोप होता की, प्रशासनाने रमजान महिन्यात केवळ वीस लोकांना नमाज़ अदा करण्याची परवानगी दिली होती, तर तिथे मोठ्या संख्येने उपासक येण्याची शक्यता होती. राज्याच्या वकिलांनी जमिनीच्या मालकी हक्कावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ॲड. धनावत यांनी सांगितले की, या प्रकरणात न्यायालयाने पुढील सुनावणी १६ मार्च रोजी ठेवली असून, याचिकाकर्त्याला जागेची छायाचित्रे आणि संबंधित कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. या प्रकरणात कायद्याचे राज्य अबाधित राहील आणि न्याय मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

# ना. अदिती तटकरें कडून माणगाव तालुका महसूल विभागाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान लोककल्याणकारी शिबीर उपक्रमाचे कौतुक

**बोरघर । माणगाव -** मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस सो. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. एकनाथ शिंदे सो, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्रीम. सुनेत्राताई पवार सो, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. चंद्रशेखरनी बावनकुळे सो महसुल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशाप्रमाणे महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१ ची घोषणा करण्यात आली आहे, त्याअनुषंगाने माणगाव तालुक्यामध्ये प्रत्येक मंडळ स्तरावर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने दि. १८/०२/२०२६ से १३/०३/२०२६ या कालावधीमध्ये माणगाव तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, सर्व धाम महसूल अधिकारी व तहसील कायर्यालय माणगाव येथील अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रत्येक गावामध्ये जाउन गाव मेटोद्वारे अभियानाबावत जनजागृती करुन लोकांचे अर्ज प्राप्त करुन घेतले तसेच शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या दाखल्यासाठी प्रत्येक शाळेत जाऊन दाखल्यासाठी अर्ज प्राप्त करुन घेतले. दिनांक १४/०३/२०२६ रोजी माणगाव तालुका महसूल विभागाच्या माध्यमातून मोर्बा आणि इंदापूर मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तर दुसरीकडे मंडळ इंदापूर अंतर्गत मंगेशी मंगल कार्यालय इंदापूर येथे शिवीराचे आयोजन करण्यात आले होते. मोर्बा मंडळ स्तरावरील शिबीरास नामदार अदिती ताई तटकरे आणि जिल्हाधिकारी डॉ किशन जावळे साहेब आवर्जून उपस्थित होते. तर इंदापूर मंडळ स्तरावरील शिबीराच्या वेळी मा.ना. कु. आदितीताई तटकरे, मंत्री, महिला व बालविकास महाराष्ट्र राज्य यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून सदर अभियानाबाबत मार्गदर्शन केले तसेच महसूल विभागाच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल महसूल विभागाचे अभिनंदन केले, सर्व लाभार्थांना या शिबीराचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले. सदर शिबीरामध्ये माणगाव तालुक्यातील महसूल विभागामार्फत व इतर शासकीय विभागामार्फत त्यांच्याकडील सेवा नागरिकांना देण्यात आल्या. महसूल विभागामार्फत ९ उत्पन्नाचे दाखले, ९ वय अधिवास दाखले, नॉनक्रिमिलेअर दाखले, २५ जातीचे दाखले वाटप करण्यात आले. तसेच जिवंत ७/१२ अंतर्गत मक्त व्यक्तीच्या वारसांची नोंद घेऊन व प्रलंबित फेरफार नोंदी निर्गत करुन ७२ लाभार्थ्यांना शिबीर ठिकाणी डिजिटल ७/१२ व ८अ वाटप करण्यात आले. ७२ फेरफार निकाली काढण्यात आले. ४५ लाभाध्यांचे नवीन आधारकार्ड करीता नोंदणी करण्यात आली. १३ नवीन रेशनकार्ड, ३ लाभार्थ्यांना एम. आर. ई. जी. एस. अंतर्गत गुरांचा गोठा, १२ लाभार्थ्यांचे संजयगांधी योजनेचे फॉर्म भरुन घेण्यात आले. १६ लाभार्थ्यांचे नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण करण्यात आले, एकात्मिक बालविकास अधिकारी कार्यालयामार्फत ८ गरोदर मातांना किट देण्यात आले. २२ लाभाध्यांचे अंधीस्टक करीता ऑनलाईन मंजूरी देण्यात आली. तसेच तालुका आरोग्य अधिकारी कार्यालया मार्फत १११ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच २४१ लाभाच्यांचे आयुष्यमान भारतकार्ड साठी नोंदणी करण्यात आली. तसेच पंचायत समिती माणगाव मार्फत एकुण ५ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल पूर्ण केल्या बाबत प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच तालुका कृषी कार्यालय माणगाव मार्फत पी. एम. किसान ऑनलाईन येक ७४ लाभार्थी, १३ पी. एम. किसान केवायसी करण्यात आले. २८ लाभाव्यांचे कृषी सर्वेक्षण फॉर्म भरण्यात आले. भूमी अभिलेख कार्यालय माणगाव यांचेमार्फत सर्व लाभार्थ्यांना त्यांचे विभागाच्या योजनांबाबत माहिती देण्यात आली. तसेच तालुका कृषि कार्यालयामार्फत १ लाभाध्यांना ट्रक्टर वाटप करण्यात आले सदर शिबीरास अदितीताई तटकरे, मंत्री महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य, डॉ. संदीपान सानप उपविभागीय अधिकारी माणगाव, विपीन लोकरे तहसीलदार माणगाव, नवनिर्वाचीत जिल्हा परिषद सदस्य दिशा दिपक जाधव, नवनिर्वाचीत पंचायत समिती सभापती विलास शिंदे, नवनिर्वाचीत पंचायत समिती उपसभापती मनिषाताई मालोरे, तसेच नवनिर्वाचीत पंचायत समिती सदस्या शुभदा पाटील गटविकास अधिकारी माणगाव, गणेश सोनार उपअधीक्षक भूमी अभिलेख माणगाव, श्रीम. अस्मिता बिरजे, एकात्मोका बालविकास अधिकारी माणगाव, श्रीम, रोशनी पंदिरकर, आरोग्य अधिकारी माणगाव, विपुल दूमे निवासी नायब तहसीलदार माणगाव, तसेच इंदापूर विभागातील सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच, इंदापूर विभागातील सामाजिक कार्यकर्ते सर्व पदाधिकारी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाजवी खटला धोरण आवश्यकच!

## मोठ्या कंपन्यांना मुंबई उच्च न्यायालयाचा दणका

**जालना -** मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांनी वाजवी खटला धोरण स्वीकारून एक आदर्श प्रस्थापित केला पाहिजे आणि लहान उद्योगांना नाहक कायदेशीर लढाईत ओढणे टाळले पाहिजे, अशा कडक शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने महिंद्रा डिफेन्स सिस्टीम्स लिमिटेड या कंपनीला सुनावले आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना () कायद्याने दिलेल्या संरक्षणाचा आदर करणे महत्त्वाचे असून, त्यांना पेमेंट न देणे आणि सततच्या कायदेशीर प्रक्रियेत अडकवून ठेवणे हे त्यांना दिवाळखोरीच्या दरीत ढकलण्यासारखे आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेशन यांनी नोंदवले.

या निकालामुळे कॉर्पोरेट जगतात खळबळ उडाली असून, मोठ्या कंपन्यांच्या लहान उद्योजकांप्रति असलेल्या वर्तनावर आणि त्यांच्या कायदेशीर धोरणांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महिंद्रा डिफेन्स सिस्टीम्सने रांजणा इंडस्ट्रीज या एका लहान उद्योगाच्या विरोधात दाखल केलेले अपील न्यायालयाने फेटाळून लावले आणि लवादाने दिलेला निर्णय कायम ठेवला. हा निर्णय लहान आणि मध्यम उद्योगांसाठी अत्यंत दिलासादायक मानला जात आहे.

सदर प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, महिंद्रा डिफेन्सने रांजणा इंडस्ट्रीजला क्यूटीटीएम असेंब्ली सेक्शन या घटकांच्या पुरवठ्यासाठी तीन खरेदी आदेश दिले होते. रांजणा इंडस्ट्रीजने मालाचा पुरवठा केला, परंतु महिंद्रा डिफेन्सने काही रक्कम देऊन उर्वरित देणी थकवली. थकबाकी आणि त्यावर कायद्यानुसार व्याज मिळावे, यासाठी रांजणा इंडस्ट्रीजने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग सुविधा परिषदेकडे दाद मागितली. यावर महिंद्राने असा बचाव केला की, मालाचा पुरवठा विलंबाने झाला होता आणि तो सदोष व तांत्रिकदृष्ट्या अयोग्य होता.

सुविधा परिषदेने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर रांजणा इंडस्ट्रीजच्या बाजूने निकाल दिला. या निकालाविरोधात महिंद्राने जिल्हा न्यायालयात धाव घेतली, परंतु तेथेही त्यांना अपयश आले. अखेरीस, जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी महिंद्राने मुंबई उच्च न्यायालयात लवाद कायदा कलम ३७ अंतर्गत अपील दाखल केले. मात्र, उच्च न्यायालयाने लवादाच्या निर्णयात आणि जिल्हा न्यायालयाच्या निकालात हस्तक्षेप करण्यास स्पष्ट नकार दिला.

उच्च न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले की, लवाद कायद्याच्या कलम ३४ आणि ३७ अंतर्गत न्यायालयाला हस्तक्षेपासाठी अत्यंत मर्यादित अधिकार आहेत. अपीलकर्ता पुराव्याचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करत आहे, ज्यास कायद्याने परवानगी नाही. न्यायालयाने एमएसएमईडी कायद्यातील कलम २(ई) चा संदर्भ देत स्पष्ट केले की, माल मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत आक्षेप नोंदवण्याची मुदत बंधनकारक आहे, केवळ सूचक नाही. महिंद्राने नोंदवलेले आक्षेप हे सुधारणेसाठी केलेल्या सूचना होत्या, कायदेशीर आक्षेप नव्हते. त्यामुळे, मुदत संपल्यानंतर देय रक्कम देणे बंधनकारक होते.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, ''मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल अत्यंत महत्त्वपूर्ण आणि स्वागतार्ह आहे. मोठ्या कंपन्या अनेकदा आपल्या आर्थिक आणि कायदेशीर ताकदीच्या जोरावर लहान उद्योजकांना खटल्यांमध्ये गुंतवून त्यांना आर्थिक आणि मानसिकदृष्ट्या खच्ची करतात. न्यायालयाच्या या निर्णयामुळे अशा प्रवृत्तींना निश्चितपणे आळा बसेल. प्रत्येक मोठ्या कॉर्पोरेट संस्थेने एक निश्चित आणि वाजवी खटला धोरण तयार करणे ही काळाची गरज आहे. किरकोळ कारणांसाठी किंवा देणी थकवण्यासाठी लहान उद्योगांना न्यायालयात खेचण्याऐवजी सामंजस्याने प्रकरणे मिटवण्यावर त्यांनी भर दिला पाहिजे. न्यायालयाचा हा निर्णय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी एक मोठे संरक्षण कवच ठरेल.''

न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, महिंद्राने सदोष माल परत केल्याचा किंवा त्यामुळे झालेल्या नुकसानीपोटी भारत सरकारला कोणताही दंड भरल्याचा पुरावा सादर केलेला नाही. तसेच, दुसऱ्या विक्रेत्याकडून काम करून घेतल्याचे सिद्ध करण्यासाठी केवळ एक खरेदी आदेश सादर करण्यात आला, परंतु त्या कामाचे पैसे दिल्याचे किंवा ते काम पूर्ण झाल्याचे कोणतेही ठोस पुरावे सादर करण्यात आले नाहीत. यावरून असे दिसते की, महिंद्राने तो माल वापरला असावा, असा निष्कर्ष कोणताही वाजवी लवाद काढू शकतो.

आपल्या अंतिम निरीक्षणात न्यायालयाने कॉर्पोरेट जगताला एक गंभीर इशारा दिला. ''मोठ्या कंपन्यांनी कोणत्या कायदेशीर लढाया लढायच्या, याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. एमएसएमईडी कायद्यातील कलम १६ अंतर्गत असलेला दंडात्मक व्याजदर आणि कलम १९ अंतर्गत असलेली ७५% रक्कम जमा करण्याची अट, ही सूक्ष्म उद्योगांच्या संरक्षणासाठी आहे, त्यांना किरकोळ खर्च म्हणून वागवण्यासाठी नाही,'' असे खडे बोल सुनावत न्यायालयाने महिंद्राचे अपील फेटाळून लावले.




## ६५ वर्षांवरील रिक्षा व मीटर टॅक्सी चालकांना धर्मवीर आनंद दिघे कल्याणकारी मंडळात नोंदणीचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या वतीने ६५ वर्षांवरील रिक्षा व मीटर टॅक्सी परवानाधारक चालकांसाठी धर्मवीर आनंद दिघे कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली असून, पात्र चालकांसाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पात्र रिक्षा व मीटर टॅक्सी चालकांनी संकेतस्थळावर जावून ऑनलाइन नोंदणी करावी. ही नोंदणी मोबाईलद्वारे घरबसल्या किंवा कोणत्याही सायबर कॅफेमधून करता येणार आहे. अर्ज भरताना काही अडचण आल्यास उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या मदत कक्षाशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

या योजनसाठी चालक हा महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा. तसेच त्याच्याकडे किमान पाच वर्षांपूर्वीचा परवाना असणे आवश्यक आहे. रिक्षा किंवा मीटर टॅक्सी चालवत असताना त्याच्याकडे कोणतेही चारचाकी वाहन नसावे, अशी अटही ठेवण्यात आली आहे.

या कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून रिक्षा व मीटर टॅक्सी परवानाधारक चालकांना सामाजिक सुरक्षा व विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. ६५ वर्षांवरील सभासद चालकांना निवृत्ती सन्मान योजनेअंतर्गत सन्मान निधी दिला जाणार असून, चालकांसाठी विमा व आरोग्य योजनाही राबविण्यात येणार आहेत. तसेच चालकांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येणार असून, कर्तव्यावर असताना चालकास दुखापत झाल्यास कल्याणकारी मंडळामार्फत आर्थिक सहाय्यही करण्यात येणार आहे. पात्र चालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांनी केले आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानानं परिपूर्ण जगाचे नायक बना- - डॉ. सूर्यकांत जोगदंड

## पदवी वितरण समारंभात आवाहन

**परभणी । प्रतिनिधी -** आधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण जगाचे आकलन करून घेण्यासाठी पदवी ही मान्यता असून पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करताना बदलता काळ लक्षात घेत विचार आणि विवेकासह ,विज्ञानाची, तंत्रज्ञानाची महती आत्मसात करण्यासाठीची अभ्यासपूर्ण साधना करत ज्ञानमयी जगाचे शिल्पकार व्हा ! असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व्यवस्थापन परिषद, सदस्य प्र.प्राचार्य डॉ.सूर्यकांत जोगदंड यांनी पदवी वितरण प्रसंगी केले.

कै. सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी परीक्षा विभागाचा वतीने आयोजित पदवी वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्र.प्राचार्य डॉ.सूर्यकांत जोगदंड बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हेमंतराव जामकर ( अध्यक्ष नूतन विद्यामंदिर शिक्षण संस्था , परभणी ) प्रमुख अतिथी स्वारातीम विद्यापीठ, माजी अधिष्ठाता कला विद्या शाखा प्र. प्राचार्य डॉ. अजयराव टेंगसे , प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे, व्यासपीठावर परीक्षा विभाग प्रमुख आशा गीरी , डॉ.परमेश्वर यादव, डॉ रविंद्र इंगळे, डॉ. अभीजीत सरनाईक, डॉ. संगिता अवचार, वैजनाथ गाडगे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवातीला पदवीचे मानकरी सर्व १४४ विद्यार्थ्यीनी पदवीचे वितरण करण्यात आले. मान्यवर , प्राध्यापक , कर्मचारी यांनी पथसंचलन करत पदवी वितरण समारंभ सभागृहा कडे प्रस्थान केले. महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत , महाविद्यालय गीत डॉ .पल्लवी कुलकर्णी आणि संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनींनी सादर केले. प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ आणि कै. सौ. कमलताई जामकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.




हेमंतराव जामकर यांचे हस्ते डॉ.सूर्यकांत जोगदंड , डॉ.अजयराव टेंगसे यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ रामचंद्र भिसे यांनी अध्यक्ष हेमंतराव जामकर

यांचा सत्कार केला. प्रा.अरुण पडघन यांनी प्राचार्य डॉ.रामचंद्र भिसे यांचे स्वागत केले. विद्यार्थिनींनी ज्ञानसाधने बरोबर कौशल्यांच्या आधारे जगाची गरज लक्षात घेत तशी सेवा प्रदान करणारे दाते बनावे. साऱ्या जगाला आज भारता कडून कुशल मनुष्यबळाची गरज भासू लागली आहे. ती कशी पूर्ण करता येईल ,हे ओळखून आधुनिक शिक्षण पध्दती च्या आधारे एआय प्रणालीतून विकसित होत आपल्या आयडियालॉजी च्या बळावर तुम्ही पदवीधर ,सम्यक जीवनशैलीचा विस्तार कराल असा आशावाद अध्यक्षिय समारोपात प्र. प्राचार्य डॉ .अजय टेंगसे यांनी व्यक्त केला.

पदवी वितरण समारंभ प्रसंगी डॉ.आशा गीरी यांनी प्रास्ताविक केले.मान्यवरांच्या हस्ते पदवी आणि पदव्युत्तर पदव्या सन्मान पूर्वक मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ आशा गिरी व आभार डॉ. परमेश्वर यादव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षक पदोन्नती प्रक्रियेला तात्काळ स्थगिती द्या

## शेख अब्दुल रहीम ची मागणी! ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांना निवेदन!

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेत कायदेशीर आणि तांत्रिक पेच निर्माण झाल्याने, आगामी / परीक्षांचे निकाल लागेपर्यंत ही प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेचे राज्य प्रवक्ता तथा संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदन दिले आहे.

**पदोन्नती प्रक्रियेतील मुख्य आक्षेपः**

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे उल्लंघन - मा. सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निकालानुसार, शिक्षकांना पात्रता सिद्ध करण्यासाठी दोन वर्षांची मुदत दिली आहे. ही मुदत अद्याप संपलेली नाही, तरीही घाईने पदोन्नती राबवणे म्हणजे न्यायालयाच्या मूळ उद्देशाला हरताळ फासणे होय, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

नवनियुक्त शिक्षकांच्या समावेशावर प्रश्नचिन्ह - जिल्हा परिषदेने प्रसिद्ध केलेल्या पदोन्नती याद्यांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक नवखे शिक्षक उमेदवारांचा समावेश आहे. सेवाप्रवेश नियमानुसार, परिविक्षाधीन () कालावधीत असलेल्या आणि सेवा कायम () नसलेल्या कर्मचाऱ्यांना थेट पदोन्नती देणे हे नियमांचे उल्लंघन ठरेल.

ज्येष्ठ शिक्षकांवर अन्यायाची भीती - फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेली आणि आगामी जून/जुलै २०२६ मधील परीक्षेचा निकाल लागल्यानंतर अनेक ज्येष्ठ शिक्षक पात्र ठरणार आहेत. जर आताच पदोन्नती प्रक्रिया राबवली, तर या अनुभवी आणि ज्येष्ठ शिक्षकांवर मोठा अन्याय होईल आणि भविष्यात यामुळे कायदेशीर खटले निर्माण होऊन शासनाचा वेळ व पैसा खर्च होईल.

प्रशासकीय गुंतागुंत टाळण्याची विनंती - गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केवळ सेवा ज्येष्ठता नव्हे, तर कायदेशीर पात्रता () असणे अनिवार्य आहे. त्यामुळे नवीन निकाल लागेपर्यंत ही प्रक्रिया थांबवून प्रशासकीय पारदर्शकता जपावी, अशी



आग्रही मागणी शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे. या मागणीची दखल न घेतल्यास न्यायालयीन लढा देण्याचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## गर्भाशयाच्या मुख कर्करोगापासून बचावासाठी मुलींना एचपीव्ही लस द्या - सीईओ मित्रू पी. एम.

**जालना । प्रतिनिधी -** मुलींना भविष्यात होणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुलींनी एचपीव्ही लस घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.




जालना जिल्ह्यात एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा प्रारंभ झाला असून जिल्ह्यातील १४ वर्षे पूर्ण व १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना ही लस देण्यात येत आहे. या लसीमुळे मुलींना भविष्यात होणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळण्यास मदत होणार आहे.

जगभरात आतापर्यंत ५० कोटींहून अधिक महिलांना ही लस देण्यात आलेली आहे. सन २००६ पासून एचपीव्ही लस उपलब्ध असल्याने ही लस नवीन नसून पूर्णपणे सुरक्षित आहे. त्यामुळे या संदर्भात पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे. एचपीव्ही लस जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मोफत उपलब्ध असून पात्र मुलींना लसीकरण केले जात आहे. या लसीकरणामुळे गर्भाशयाच्या मुख कर्करोगाचे प्रमाण निश्चितपणे कमी होण्यास मदत होईल. मुलींचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी एचपीव्ही लसीकरण मोहीम हे शासनाचे महत्त्वपूर्ण पाऊल असून पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करून त्यांना या आजारापासून संरक्षण द्यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांनी केले आहे.

## कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी केवायसी अपडेट करणे आवश्यक

**जालना । प्रतिनिधी -** शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेण्यासाठी जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आपल्या बँक शाखेत तातडीने केवायसी () कागदपत्रे अद्ययावत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संबंधित बँक शाखेत सादर करावीत. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने शेतकऱ्यांना आधार कार्ड आणि इतर महत्त्वाची केवायसी कागदपत्रे तात्काळ अद्ययावत करण्यासाठी बँक शाखेत संपर्क साधावा लागेल असे आवाहन केलेले आहे. शेतकऱ्यांनी कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर, त्यांना शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेचा लाभ मिळवता येईल.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवण्यासाठी योग्य प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले असून, शेतकऱ्यांना बँक शाखेत जावून केवायसी फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे.

## गुढी पाडवानिमित्ताने रुक्मिणी परिवारातर्फे बुधवारी जालन्यात चैत्र पालवी संगीत मैफिल

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रुक्मिणी परिवारातर्फे गुढीपाडवा व हिंदू नववर्षानिमित्त मागील २६ वर्षापासून संगीत मैफलीचे आयोजन करण्याची परंपरा अखंडितपणे सुरू असून, त्या अंतर्गत बुधवार दि.१८ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता रुक्मिणी गार्डन येथे चैत्र पालवी या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सुप्रसिद्ध टीव्ही कलावंत धवल चांदवडकर, रसिका गानू व ज्योत्स्ना स्वामी चैत्र पालवी या कार्यक्रमात हिंदी-मराठी गीतांची मैफल सादर करणार असून, प्राजक्ता मांडके ह्या निवेदिका म्हणून आपली



धवल चांदवडकर | रसिका गानू | ज्योत्स्ना स्वामी

भूमिका पार पाडणार आहेत. जालनेकर रसिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून या सुरेल संगीत कार्यक्रमाचा आनंद घ्यावा आणि निशुल्क प्रवेशिकेसाठी हॉटेल मधुबन, आरती फूड (शनी मंदिर जुना जालना), श्री फॅब्रिकेटर (नूतन वसाहत), श्री स्वामी असोसिएट्स (मस्तगड) देकु केटरर्स (रुक्मिणी गार्डन) येथे संपर्क करावा, असे आवाहन रुक्मिणी परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद परिसरात कर्मचाऱ्यांनी केले श्रमदान







जिल्हा परिषद परिसरात धाण करणाऱ्या लोकांकडून करून घेतली साफसफाई मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा धाडसी निर्णय घाण करणाऱ्यांना देणार नोटीस व पर्यावरण कायद्यानुसार करणार संबंधित वर कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद परिसर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेनू पीएम यांच्या मार्गदर्शन खाली श्रमदान करत स्वच्छता मोहीम राबवली. या उपक्रमात परिसरातील कचरा, गवत व प्लास्टिक व झाडाझुडपांची साफसफाई करण्यात आली.

स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती व्हावी तसेच कार्यालयीन परिसर स्वच्छ ठेवण्याची सवय लागावी या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत परिसरातील रस्ते, बागेचा भाग आणि कार्यालयासमोरील जागेची साफसफाई केली.

यावेळी नियमितपणे स्वच्छता राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगत परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. या श्रमदान उपक्रमात जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता सर्जेराव शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, विजय चव्हाण, जोशी नरेंद्र, डी.पी घोरपडे , नंदकिशोर शहाणे, विनोद भगत, एन डी पाडेवार, आकाश ताकतोडे,कर्मचारी तसेच संबंधित विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.